
बासरी

रचना, चित्र : पुलक बिस्वास

मराठी : अश्विनी बर्वे






बासरी

रचना, चित्र : पुलक बिस्वास
मराठी : अश्विनी बर्वे






खूप पूर्वी आणि खूप दूर,एका वेगाने वाहणाऱ्या नदीच्या किनारी वसलेल्या गावात, एका मुलीचा जन्म झाला. आईने आपल्या मुलीला जवळ घेतलं आणि पौर्णिमेच्या चंद्राकडे बघितलं, जो आकाशात चमकत होता.

"चंद्र," आई बडबडली.

" चंद्राच्या नावावरून मी तुला चंद्रा हाक मारेन.


जसजशी चंद्रा मोठी झाली, तिने आपल्या आईचा सावलीसारखा पाठलाग केला. रोज ती शेतात आपल्या आई-वडिलांना मदत करत असे. तिथं तिची आई आपली जुनी लाकडाची बासरी वाजवत असे. चंद्रा चमकणाऱ्या उन्हात मातीत खेळत असे. आई संध्याकाळच्या थंड आकाशाच्या आणि वाढणाऱ्या चंद्राची धून वाजवत असे.



मग एक वर्षी गावावर भयंकर आपत्ती आली. मान्सूनचा धुवादार पाऊस पडला. पूर नदीच्या किनाऱ्यावरून वर आला आणि सगळीकडे पसरला. त्याने गायी,गाड्या आणि झोपड्या वाहून नेल्या.

चंद्राच्या आईने तिला सगळ्यात उंच झाडावर ढकलून वर चढवले. “फांदीला घट्ट पकडून ठेव,” ती ओरडली आणि तिने मग चंद्राकडे आपली बासरी सोपवली.

चंद्राने झाडाच्या फांदीला चिकटून राहिली आणि रडू लागली कारण तिचे आईवडील पुरात गायब झाले होते.





मग जेव्हा पाणी कमी झाले तेव्हा चंद्रा आपल्या गावात परत आली. पण तिथं सगळीकडे माती आणि लाकडाचे ढीग होते.

“आम्हांला वाटतं की, तुला घरात घ्यावंच लागेल,” तिचे काका म्हणाले. मग ते चिडले.

“पण तू तुझं भरण-पोषण स्वतः केलं तर चांगलं होईल,” चंद्राची काकू म्हणाली.

चंद्राचे जीवन आता तितकेच थंड आणि कठोर झाले होते, जितके ते आधी उत्साहाने आणि प्रेमाने भरलेले होते. काका-काकूने तिच्याकडून निर्दयतेने काम करून घेतले. त्यांच्या दोन मुलांनी सुद्धा चंद्राला खूप त्रास दिला. हळूहळू चंद्र दुबळी-लुकडी आणि शांत सावली झाली.






पण रोज सकाळी आणि संध्याकाळी, जेव्हा ती गायींना नदीकडे घेवून जाई, तेव्हा चंद्रा आपल्या आईची गुळगुळीत लाकडाची बासरी पण घेऊन जात असे. ती झाडं आणि आकाशाचं गाणं वाजवण्याचा प्रयत्न करे, पण बासरीतून दुःख आणि वेदनेचे सूर निघत.


शेवटी काका, चंद्राची बासरी अजून सहन करू शकला नाही. एक दिवस त्यांनी बासरी नदीत फेकून दिली. “रडणं बंद कर आणि कामाला परत जा,” ते चंद्रावर ओरडले.

चंद्रा, बासरी वाचवायला धावली, पण नदीच्या वेगवान प्रवाहात बासरी वाहून गेली.

चंद्रासाठी तो हिवाळा खूप कठीण आणि एकटं करणारा होता. तिने शिट्टी वाजवून आपल्या आईच्या गाण्याचे सूर जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला, पण कधी-कधी गाण्यांचे बोल तिला आठवत नसे.

हिवाळ्यानंतर खूप कडक उन्हाळा आला. सूर्य तापू लागला आणि त्याच्या चटक्याने नदीचा प्रवाह वाळवून तिचा एक नाला बनवला. चंद्रा रोज गायी चरायला नदीकडे वरच्या बाजूला घेऊन जाई. पीक पूर्ण वाळून आले आणि आता जेवण मिळणं अवघड झाले होते. चंद्राला घरात सगळ्यात कमी खायला मिळत असे.





एका सकाळी चंद्रा, गायींना जितकं शक्य होईल तेवढं दूर घेऊन गेली. भुकेने तिच्या पोटात दुखू लागले. ती एका झाडाखाली बसली. आपल्या कोरड्या ओठांनी तिने आपल्या आईच्या गाण्यांची धून वाजविण्याचा प्रयत्न केला.

तेव्हाच तिला आपल्या आईच्या बासरीचा आवाज ऐकू आला.


तिला आईच्या बासरीचे सूर स्पष्ट ऐकू येत होते. तिथं कोणीच दिसत नव्हतं पण गोड आणि स्पष्ट बासरी वाजत होती. ती धून आशेने भरलेली होती.

तेव्हाच गरम हवेत केळ्याचे पान दिसू लागले, ज्यावर भात, डाळ आणि वांग्याची भाजी होती - एकदम तशीच, जशी चंद्राची आई करत असे.

ते खाणं खरं होतं! चंद्रा भरपेट जेवली ,मग ती गाढ झोपी गेली.

त्यानंतर रोज जेव्हा चंद्रा गायींना घेवून नदीकडे जाई तेव्हा बासरी तिच्यासाठी आनंदाचे आणि प्रेमाचे गाणी गात असे आणि तिला जेवायला देत असे.

रोज रात्री चंद्राचे काका तिच्याकडे संशयाने बघत असे. एकीकडे गायी वाळत होत्या आणि त्यांची हाडं दिसत होती, तरीपण चंद्राचे गाल वर आले होते. काका विचार करत होते की, चंद्राला कोण जेवू घालत असेल?



मग त्यांनी आपल्या मोठ्या मुलाला चंद्राच्या मागे शोध घ्यायला पाठवले. मुलगा झाडाच्या मागे लपून राहिला. तो बासरीची धून ऐकून आणि जेवण प्रकट होतांना बघून चकित झाला.





त्यादिवशी जेव्हा ती घरी आली, तेव्हा चंद्राची गाठ काका-काकुच्या उग्र रूपाशी झाली.

" तू चांगलं जेवण जेवण्याची हिंमत कशी केली आणि आम्हांला काहीच कसं दिलं नाही!" काकू ओरडली. "तुला जेवण कुठून मिळालं?"

काकू हे मान्य करायला तयार नव्हती की चंद्राला त्याबाबत काहीच माहित नव्हते.

"ही एक अपवित्र जादू आहे," तिचे काका म्हणाले.

" तू एक दुष्ट मुलगी आहे!" तिची काकू म्हणाली. "तुझ्याचमुळे दुष्काळ पडला!"

तेव्हाच गर्जना करत पावसाचे थेंब पडले. शेवटी मान्सून आला!

पावसाच्या आनंदात, तिचे काका-काकू तिला विसरले.


त्या रात्री रात्रभर,आणि दुसऱ्या दिवशी आणि त्याच्याही पुढच्या दिवशी पाऊस पडतच राहिला.

नदी एका बारीकश्या धारेपासून एका रौद्रात बदलली आणि मग नदी जमिनीला गिळायला उत्सुक होऊन आपला किनारा सोडून धावू लागली.

मुसळधार पावसात गावातले लोक उंच जागेवर गेले. चंद्रापण त्यांच्या मागे-मागे गेली,पण तिच्या काकांनी तिला मागे ढकलले. “दूर हो दुष्ट मुली! तुच हा पूर आणला आहे.”



पाणी वेगाने वाढू लागले. पाणी चंद्राच्या गुडघ्यापर्यंत वर चढले मग तिच्या कमरेपर्यंत. असं वाटत होतं की जसे पाणी,चंद्राला वाहून घेऊन जाईल.




पाण्याच्या गर्जनेच्या वेळी, चंद्राला एक बासरीची धून ऐकू आली. ती धून नदीच्या मधून तिला हाक मारत होती. आधी चंद्रा संकोचली मग पाण्याच्या गहनतेतून येणाऱ्या बासरीच्या गाण्याकडे ती निघाली. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे चंद्राचे पाय जमिनीवरून सुटले. बासरी एकसारखी वाजत होती आणि मग काहीतरी ठोस वाहत चंद्राच्या हातात आलं.

तो एक दोर होता, मोठा आणि मजबूत.

चंद्राने दोरीला ओढायला सुरुवात केली आणि बासरीने तिला तसं करण्याचा सारखा आग्रह केला. शेवटी तिचे पाय जमिनीवर टेकले.

पण मग दोरी कुठेतरी गेली.

आता चंद्राच्या हातात तिच्या आईची बासरी होती.







पाऊस थांबला आणि आभाळ मोकळे झाले. चंद्राने आकाशात चांदोबाचे सोनेरी हसू बघितले.

तिने बासरी आपल्या ओठांना लावली आणि ती वाजवू लागली.



तेव्हा सावलीतून एक पुरुष आणि एका स्त्रीने बाहेर पाऊल टाकलं.

“तू कोण आहेस,मुली?” त्यांनी विचारलं.

चंद्राने त्यांना आपली कहाणी सांगितली.

महिला म्हणाली, “मागच्यावर्षी आलेल्या पुरात आम्ही आमचा मुलगा गमावला .”

“आम्हांला एका बासरीची धून ऐकू येई जी आमचं दुःख सांगे,” पुरुष म्हणाला. “पण आज रात्री, आम्ही बासरीला आशेचं गाणं गातांना ऐकलं.”

महिला हसली. “तू आमच्या बरोबर राहशील आणि आमची मुलगी होशील?”

“हो," चंद्रा म्हणाली. “हो नक्की.”



रोज चंद्रा आपल्या नव्या कुटुंबांबरोबर शेतात काम करे. रोज संध्याकाळी ती त्यांच्याबरोबर मोठ्या नदीवर जाई. तिथं ती आपली बासरी वाजवे. कधी-कधी गरमीची गाणी ,किंवा मग नदीच्या वेगवान प्रवाहाची धून वाजवत असे. कधी-कधी ती काळे आकाश आणि पहिल्या ताऱ्याची धून वाजवे. पण ती नेहमी चांदोबाच्या आशेची आणि ताकदेची धून वाजवत असे.







